दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र/प्रवेश विभाग
दि.३०/०५/२०२६.

अंतर्गत कार्यालयीन टिपणी:— इतर परीक्षा २/३ विभागास.

**विषय:— एकाच वेळी दोन परीक्षा अशा डयुअल डिग्रीच्या विद्यार्थ्यांची पुन:श्च परीक्षा घेण्याबाबत.**

संदर्भ:— १. दि. ०७/०५/२०२६ रोजीची या केंद्राची मान्यता टिपणी.
२. दि. २१/०३/२०२५ रोजीची ठरावाची प्रत.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपल्या विभागाने मार्च/एप्रिल २०२५ परीक्षेच्या वेळी दोन परीक्षा अशा डयुअल डिग्रीच्या विद्यार्थ्यांची माहिती प्रशासकीय मान्यता घेवून सदरचा डाटा एक्सेलशीटमध्ये माहिती भरून पाठविण्याबबात दि. ३०/०५/२०२६ रोजी तोंडी कळविले होते. त्यानुसार सदरची माहिती मागील ऑक्टोंबर २०२५ परीक्षाप्रमाणे विहित नमुन्यात पुढील योग्य त्या अनुषंगिक कार्यवाहीसाठी आपल्या विभागाकडे पाठवित आहोत.

सोबत:— संदर्भिय इतर अनुषंगिक कागदपत्रे.

कक्ष अधिकारी

Scanned with OKEN Scanner

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र /प्रवेश विभाग
दि. 07/05/2026.

**विषय : दुहेरी पद्धतीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पुर्नपरीक्षा घेण्याबाबत विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या अर्जाबाबत.**

संदर्भ :
1. श्री. मकरंद मल्लिकार्जून डोईजड (एम.ए. हिंदी भाग–2) यांचा दि. 28/04/2026 रोजीचा विनंती अर्ज.
2. श्री. अभिषेक उमाकांत मछले (एम.ए. हिंदी भाग–2) यांचा दि. 05/05/2026 रोजीचा विनंती अर्ज.
3. श्री. माधव बाळाजी मुंडे (एम.ए. अर्थशास्त्र भाग–2) यांचा दि. 06/05/2026 रोजीचा विनंती अर्ज.
4. श्री. दशरथ मारूती देसाई (एम.ए. इतिहास भाग–1) यांचा दि. 08/05/2026 रोजीचा विनंती अर्ज.

**सादर,**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत दुहेरी पद्धतीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष 2025–2026 मधील मार्च/एप्रिल परीक्षांचे वेळापत्रक संबंधित नियमित महाविद्यालयांच्या परीक्षांच्या वेळापत्रकाशी एकाच कालावधीत आलेले आहेत. त्यामुळे संदर्भीय विद्यार्थ्यांच्या दोन्ही अभ्यासक्रमांच्या परीक्षा एकाच वेळी असल्याने संबंधित विषयांच्या परीक्षेस उपस्थित राहणे शक्य झाले नाही. याबाबत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विनंती अर्जामध्ये त्यांनी सदर बाब नमूद करून पुर्नपरीक्षा घेण्याबाबत या केंद्रास कळविले आहे. सोबत दोन्ही परीक्षांची हॉल तिकीट जोडले आहेत.

**याबाबत कार्यालयीन निवेदन असे की,**

1. सदर प्रकरणी कार्यालयीन स्तरावर पडताळणी केली असता, दुहेरी पद्धतीतील दोन्ही परीक्षांच्या वेळा व तारखा एकाच वेळी एकत्र आल्यामुळे विद्यार्थी संबंधित विषयांच्या परीक्षेस अनुपस्थित राहिल्याचे स्पष्ट होते.
2. मार्च/एप्रिल 2026 च्या परीक्षेसाठी दुहेरी पदवी अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज भरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे एकाच वेळी दोन्ही परीक्षेचे वेळापत्रक ओव्हरलॅप झालेले आहे अशा विद्यार्थ्यांकडून व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून अभ्यास केंद्रामार्फत गुगल लिंक द्वारे माहिती दिनांक 11/05/2026 पर्यंत भरण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
3. काही विद्यार्थ्यांनी उपरोक्त संदर्भास अनुसरून विनंती अर्ज या केंद्राकडे सादर केलेले आहेत. सबब सदरचे प्राप्त अर्ज व त्या अनुषंगिक कागदपत्रे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी संबंधित परीक्षा विभाग इतर परीक्षा 2/3 विभागाकडे पाठविण्यास मान्यता असावी.

मान्यतेसाठी सादर.

i) कार्यालयीन निवेदन व संदर्भित अर्ज ... @ मान्य ... ii) दि.11.05.2026 पर्यंत प्राप्त माहिती ... कळविण्यात येईल
कक्ष अधिकारी
11/5/2026

On Leave.
सहाय्यक प्राध्यापक
(एम.ए. हिंदी)

सहाय्यक प्राध्यापक
(एम.ए. अर्थशास्त्र)

सहाय्यक प्राध्यापक
(एम.ए. इतिहास)

समन्वयक

अ' मान्य ...

सहाय्यक कुलसचिव
11-5-2026

Google form ... प्राप्त विद्यार्थ्यांची यादी ... आहे
11/5/2026

Bhonde 11/05/2026
उपकुलसचिव

11/05/2026
मा. प्र. संचालक

"A++" *Accredited by* NAAC (2021) With CGPA-3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## परिपत्रक

**विषय :** - दुहेरी पदवी प्रवेशाबाबत.

**संदर्भ :**- १. पात्रता विभागाचे दि. १६.०६.२०२५ रोजीचे परिपत्रक

२. पात्रता विभागाचे दि.२८ जुलै २०२२ रोजीचे परिपत्रक व दि.२६ जुलै २०२२ रोजी आदेश

३ विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दिनांक १३ एप्रिल २०२२ रोजीचे पत्र व मार्गदर्शक सूचना

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे (डिस्टंस व ऑनलाईन मोड) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे प्रवेश अर्ज दि.१५.१०.२०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्ष दुहेरी पदवी माध्यमातून प्रवेशाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना उपरोक्त संदर्भानुसार यापूर्वी निश्चित झालेल्या आहेत, हे याबाबत आपणास विदितच आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये दुहेरी पदवी अंतर्गत या केंद्राअंतर्गत काही विद्यार्थी प्रवेश घेतलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांनी दुहेरी ऑनलाईन अर्जाची प्रत, शुल्क पावती व इतर अनुषंगिक कागदपत्रे या केंद्रात जमा करणे आवश्यक आहे. तरी याबाबत आपल्या केंद्रावरील संबंधित विद्यार्थ्यांना मागदर्शक सूचना अवगत कराव्यात. सोबत मार्गदर्शक सूचना जोडल्या असून याबाबत संबंधित विद्यार्थ्याना अवगत करून दुहेरी अर्ज व शुल्क भरणेबाबत अवगत करावे.

Bhinde

उपकुलसचिव

जा.क्र.शिवाजी वि./सीडीओई/ 183 /२०२५-२६

दिनाकं : 17 OCT 2025

प्रति,

मा.अभ्यासकेंद्र प्रमुख/समन्वयक
सर्व दूरशिक्षण व ऑनलाईन अभ्यासकेंद्रे,
कोल्हापूर, सांगली व सातारा.

प्रत. १. उपकुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
२. सहाय्यक कुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
३. समन्वयक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
४. कक्ष अधिकारी/ऑफीस सुपरवायझर कम डाटा एंन्ट्री प्रोसेसर, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
५. सर्व संबंधित विषयाचे हंगामी सहाय्यक प्राध्यापक
६. विभागीय समन्वयक, सांगली व सातारा
७. सर्व संबंधित प्रशासकीय सेवक

"A++" *Accredited by* NAAC (2021) With CGPA-3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### दुहेरी पदवी प्रवेशाच्या अमंलबजावणीबाबत अभ्यासकेंद्राना सूचना

१. दुहेरी पदवीसाठी प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी https://sukapps.unishivaji.ac.in/dualdegree_application/#/login या लिंकवरून दुहेरी पदवी करण्यासंबंधीचा अर्ज भरणे अनिवार्य आहे. तसेच ऑनलाईन पध्दतीने शुल्क रू. १०००/- भरणे आवश्यक आहे. दुहेरी पदवी अर्ज भरणेबाबत सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यानुसार विद्यार्थ्यांनी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरावे. https://www.unishivaji.ac.in/distedu/admission-2025-2026

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले आपल्या प्रवेश अर्जासोबत संबंधित अभ्यासकेंद्रामध्ये हार्ड कॉपी स्वरूपात जमा करावेत. ते अर्ज या केंद्रात जमा झाल्यानंतर दुहेरी पदवी प्रवेश अंतर्गत घेतलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम पात्रतेसंदर्भातील पुढील कार्यवाही करणेत येईल. जे विद्यार्थी दुहेरी पदवीअंतर्गत प्रवेश घेतलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी अर्ज व शुल्क न भरल्यास सदर विद्यार्थ्यांची पात्रता ही अंतिम केली जाणार नाही

३. दुहेरी पदवी अभ्यासक्रमास प्रवेश अर्ज विहित मुदतीत भरावा व तो संबंधित अभ्यासकेंद्रामध्ये जमा करणेत यावा.

४. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यानी दुहेरी पदवी प्रवेश घेत असताना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र यांचे केंद्रप्रमुख, समन्वयक, सहाय्यक प्राध्यापक, यांच्या समन्वयाने व मार्गदर्शनाने त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून प्रवेश घ्यावा जेणेकरून तांत्रिक व शैक्षणिक समस्येसंदर्भात मार्गदर्शन होईल.

५. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दिनांक १३ एप्रिल २०२२ रोजीचे पत्र व मार्गदर्शक सूचना, पात्रता विभागाचे दि. १६.०६.२०२५ दि. २८ जुलै २०२२ रोजीचे परिपत्रक व दि.२६ जुलै २०२२ रोजीचा आदेश यांचा संदर्भ घेवून कार्यअमंलबजावणी करावी.

Shinde

उपकुलसचिव

"A++" *Accredited by* NAAC (2021) With CGPA-3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महत्वाची सूचना

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे (डिस्टंस व ऑनलाईन मोड) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची प्रवेश अर्ज दि.१५.१०.२०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आले होते. यामधील ज्या विद्यार्थ्यांनी दुहेरी पदवी अभ्यासक्रमअंतर्गत प्रवेश घेतलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी.

१. दुहेरी पदवीसाठी प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी https://sukapps.unishivaji.ac.in/dualdegree_application/#/login या लिंकवरून दुहेरी पदवी करण्यासंबंधीचा अर्ज भरणे अनिवार्य आहे. तसेच ऑनलाईन पध्दतीने शुल्क रू. १०००/- भरणे आवश्यक आहे. दुहेरी पदवी अर्ज भरणेबाबत सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यानुसार विद्यार्थ्यांनी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरावे. https://www.unishivaji.ac.in/distedu/admission-2025-2026

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले आपल्या प्रवेश अर्जासोबत संबंधित अभ्यासकेंद्रामध्ये हार्ड कॉपी स्वरूपात जमा करावेत. ते अर्ज या केंद्रात जमा झाल्यानंतर दुहेरी पदवी प्रवेश अंतर्गत घेतलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम पात्रतेसंदर्भातील पुढील कार्यवाही करणेत येईल. जे विद्यार्थी दुहेरी पदवीअंतर्गत प्रवेश घेतलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी अर्ज व शुल्क न भरल्यास सदर विद्यार्थ्यांची पात्रता ही अंतिम केली जाणार नाही

३. दुहेरी पदवी अभ्यासक्रमास प्रवेश अर्ज विहित मुदतीत भरावा व तो संबंधित अभ्यासकेंद्रामध्ये जमा करणेत यावा.

४. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यानी दुहेरी पदवी प्रवेश घेत असताना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र यांचे केंद्रप्रमुख, समन्वयक, सहाय्यक प्राध्यापक, यांच्या समन्वयाने व मार्गदर्शनाने त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून प्रवेश घ्यावा जेणेकरून तांत्रिक व शैक्षणिक समस्येसंदर्भात मार्गदर्शन होईल.

Shinde

उपकुलसचिव

अंतर्गत कार्यालयीन टिपणी – १. अभ्यास मंडळे विभाग

२. दुरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र.

विद्यापीठ कार्यालयामध्ये दि. १४/०१/२०२६ रोजी अधिष्ठाता मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला असून त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

प्रभारी अधीक्षक

आस्थापना पी.जी.

दि. २०/०१/२०२६

सोबत: वरीलप्रमाणे.

Scanned with CamScanner

अधिष्ठाता मंडळ
दिनांक :- 14/01/2026.

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

बैठकीचा कार्यवृत्तांत

अधिष्ठाता मंडळाची बैठक दिनांक १४/०१/२०२६

मा. प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) श्रीमती जे. पी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळाची बैठक दिनांक १४/०१/२०२६ रोजी विद्यापीठ कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) श्रीमती जे. पी. जाधव<br>मा. प्रभारी प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | प्रा. (डॉ.) आर. व्ही. गुरव<br>प्र.अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ३. | प्राचार्या (डॉ.) श्रीमती व्ही. व्ही. मैंदर्गी<br>प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ४. | प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख<br>प्र.अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ५. | प्रा. (डॉ.) ए. बी. साळी<br>प्र.अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ६. | प्रा. (डॉ) एस. डी. डेळेकर<br>प्र.संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळ | सचिव सचिव |

सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे कामकाज करण्यात आले.

(०१) दि. २६/१२/२०२५ रोजी आयोजित केलेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

| | |
|---|---|
| ठराव | दि. २६/१२/२०२५ रोजी आयोजित केलेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. |

Scanned with CamScanner

(०२) जैवतंत्रज्ञान अधिविभागामध्ये B.Sc. Biotechnology (AEDP) हा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) अन्वये विद्यापरिषदेस शिफारस करण्याचीबाब विचारार्थ.

( टिपणी :- प्रभारी अधिविभागप्रमुख, जैवतंत्रज्ञान अधिविभाग यांनी सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात B.Sc. Biotechnology (AEDP) हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत दि. २९/११/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे प्रस्ताव सादर केला आहे.

नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ (१) (b) येथे अधिष्ठाता मंडळाचे अधिकार व कर्तव्यातील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

३७ (१) (b) to Consider and recommend to Academic Council, new courses, inter-disciplinary courses and short-term training programmes referred to it by the faculty.

उपरोक्त तरतदींनुसार सदर अभ्यासक्रमास प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांनी विद्याशाखेच्यावतीने अधिष्ठाता मंडळास शिफारस केली आहे.

सबब, जैवतंत्रज्ञान अधिविभागामध्ये B.Sc. Biotechnology (AEDP) हा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) अन्वये विद्यापरिषदेस शिफारस करण्याचीबाब विचारार्थ.)

| | |
|---|---|
| ठराव | जैवतंत्रज्ञान अधिविभागामध्ये B.Sc. Biotechnology (AEDP) हा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) अन्वये विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली. |

(०३) जीवरसायनशास्त्र अधिविभागामध्ये B.Sc. Biochemistry (AEDP) हा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) अन्वये विद्यापरिषदेस शिफारस करण्याचीबाब विचारार्थ.

( टिपणी :- अधिविभागप्रमुख, जीवरसायनशास्त्र अधिविभाग यांनी सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात B.Sc. Biochemistry (AEDP) हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत दि. २९/११/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे प्रस्ताव सादर केला आहे.

Scanned with CamScanner

नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ (१) (b) येथे अधिष्ठाता मंडळाचे अधिकार व कर्तव्यातील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

३७ (१) (b) to Consider and recommend to Academic Council, new courses, inter-disciplinary courses and short-term training programmes referred to it by the faculty.

उपरोक्त तरतदींनुसार सदर अभ्यासक्रमास प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांनी विद्याशाखेच्यावतीने अधिष्ठाता मंडळास शिफारस केली आह.

सबब, जीवरसायनशास्त्र अधिविभागामध्ये B.Sc. Biochemistry (AEDP) हा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) अन्वये विद्यापरिषदेस शिफारस करण्याचीबाब विचारार्थ.)

| | |
|---|---|
| ठराव | जीवरसायनशास्त्र अधिविभागामध्ये B.Sc. Biochemistry (AEDP) हा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) अन्वये विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली. |

(०४) छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ऐतिहासिक कार्यावर आधारित सर्टिफिकेट कोर्स सुरु करण्याबाबत मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) येथील तरतुदीनुसार विद्यापरिषदेस शिफारस करण्याचीबाब विचारार्थ.

( टिपणी :- ॲड. अभिषेक राजेंद्र मिठारी, अधिसभा सदस्य यांनी दिनांक १५/०३/२०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्रमांक ६१ द्वारे खालीलप्रमाणे आपली सूचना पाठविली होती.

छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ऐतिहासिक कार्यावर आधारित सर्टिफिकेट कोर्स सुरु करण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा संबंधित अधिकार मंडळास करीत आहे.

उपरोक्त सुचनेबाबत खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | सदरचा ठराव ॲड. अभिषेक राजेंद्र मिठारी, अधिसभा सदस्य यांनी सभागृहात मांडला. सदर ठराव मांडल्यानंतर व त्यास अनुमोदन दिल्यानंतर ठराव एकमताने मान्य करण्यात आला. |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७(b) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

Scanned with CamScanner

(b) to consider and recommend to the Academic Council, new courses, inter-disciplinary courses and short-term training programmes referred to it by the faculty.

उपरोक्त तरतूदी नुसार अधिसभेची शिफारस दि. १७/०६/२०२५ रोजी आयोजित केलेल्या मानवविज्ञान शाखेच्या बैठकीपुढे विषय क्र. ९ व्दारे विचारार्थ ठेवला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ऐतिहासिक कार्यावर आधारित सर्टिफिकेट कोर्स सुरु करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन अधिष्ठाता मंडळास शिफारस करण्यात आली. |

सबब, छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ऐतिहासिक कार्यावर आधारित सर्टिफिकेट कोर्स सुरु करण्याबाबत मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) येथील तरतुदीनुसार विद्यापरिषदेस शिफारस करण्याचीबाब विचारार्थ.)

| | |
|---|---|
| ठराव | सदरचा अभ्यासक्रम इतिहास अधिविभागाच्या अधिपत्याखाली सुरु करण्याच्या अनुषंगाने इतिहास अधिविभागाकडून याबाबतचा आर्थिक भारसह सविस्तर प्रस्ताव मागवून घेऊन तो अधिष्ठाता मंडळास सादर करण्यात यावा. |

(०५) छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या इतिहासावर आधारित डिप्लोमा कोर्स सुरु करण्याबाबत मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) येथील तरतुदीनुसार विद्यापरिषदेस शिफारस करण्याचीबाब विचारार्थ.

( टिपणी :- ॲड. अजित रघुनाथ पाटील, अधिसभा सदस्य यांनी दिनांक १५/०३/२०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्रमांक ३८ द्वारे खालीलप्रमाणे आपली सूचना पाठविली होती.

छत्रपती महाराणी ताराबाई यांच्या इतिहासावर आधारित डिप्लोमा कोर्स सुरु करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा संबंधित अधिकार मंडळास करीत आहे.

उपरोक्त सुचनेबाबत खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | सदरचा ठराव ॲड. अजित रघुनाथ पाटील, अधिसभा सदस्य यांनी सभागृहात मांडला. सदर ठराव मांडल्यानंतर व त्यास अनुमोदन दिल्यानंतर ठराव एकमताने मान्य करण्यात आला. |

Scanned with CamScanner

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७(b) येथील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

(b) to consider and recommend to the Academic Council, new courses, inter-disciplinary courses and short-term training programmes referred to it by the faculty.

उपरोक्त तरतूदी नुसार अधिसभेची शिफारस दि. १७/०६/२०२५ रोजी आयोजित केलेल्या मानवविज्ञान शाखेच्या बैठकीपुढे विषय क्र. १० व्दारे विचारार्थ ठेवला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या इतिहासावर आधारित डिप्लोमा कोर्स सुरु करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन अधिष्ठाता मंडळास शिफारस करण्यात आली. |

सबब, छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या इतिहासावर आधारित डिप्लोमा कोर्स सुरु करण्याबाबत मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ उपकलम (१) (b) येथील तरतुदीनुसार विद्यापरिषदेस शिफारस करण्याचीबाब विचारार्थ.)

| | |
|---|---|
| **ठराव** | **सदरचा अभ्यासक्रम इतिहास अधिविभागाच्या अधिपत्याखाली सुरु करण्याच्या अनुषंगाने इतिहास अधिविभागाकडून याबाबतचा आर्थिक भारसह सविस्तर प्रस्ताव मागवून घेऊन तो अधिष्ठाता मंडळास सादर करण्यात यावा.** |

(०६) विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या विविध विना अनुदानीत अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क निश्चित/सुधारित करण्याबाबत गठीत केलेल्या Fees Computing Committee (FCC) समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.

(टिपणी:- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ कलम १०१ नुसार शुल्क निश्चितीबाबत दंडक ८१ (I) नुसार शुल्क निर्धारण समितीचे कामकाज करणेसाठी दंडकातील तरतूदीनुसार Fees Computing Committee (FCC) समिती गठीत करण्यात आली आहे.

उपरोक्त समितीकडून विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या विविध विना अनुदानीत अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क निश्चित/सुधारित करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने Fees Computing Committee (FCC) समितीची दि. ०७/०१/२०२६ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचा कार्यवृत्तात नुसार (Annexure -I) शुल्क निश्चित करुन अधिष्ठाता मंडळास शिफारस केली आहे. सदरची शिफारस विचारार्थ) (सोबत कार्यवृत्तांत व (Annexure-I) जोडला आहे.)

Scanned with CamScanner

उपरोक्त Fees Computing Committee (FCC) समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.)

| | | |
|---|---|---|
| ठराव | १. | B. B. A -(integrated Programme III Year), M. C. A., PG (DIS) या अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क दुरूस्तीसह (Roundup ) स्विकारून शैक्षणिक शुल्क निर्धारण समिती शिफारस करण्यात आली. |
| | २. | Fee Computing Committee (FCC) च्या ठराव क्रमांक २ ते ५ यांची नोंद घेण्यात आली.<br>अ) या पुढे महाविद्यालय अथवा अधिविभाग यांच्या फी प्रस्तावाबाबत FCC पुढे विषय असताना महाविद्यालय अथवा विद्यापीठ अधिविभाग यांचे प्रतिनिधी उपस्थित नसताना ते विषय पटलावर घेवू नयेत.<br>ब) डॉ . व्ही. एम. पाटील व्य. प. सदस्य यांना विद्याशाखा व अभ्यासक्रम निहाय व अभ्यासक्रमाच्या विषयाचा कार्यभार यासह सविस्तर प्रस्ताव सादर करण्यास कळवावे व ते प्रस्ताव पुढील BOD च्या पुढील बैठकीपुढे ठेवावेत-<br>क) श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण यांना यापुढे फि वार्ढाबाबतचा प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही असे कळवावे. |

(०७) दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश, पात्रतेपासून परीक्षेपर्यंत येणाऱ्या अडचणीबाबत सविस्तर नियमावली करणेची बाब विचारार्थ.

(टिपणी:- संगणक केंद्रामार्फत दुहेरी प्रमाणपत्राच्या संगणक प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार बदल करण्याबाबत दि.३०/०६/२०२५ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. याबाबत दि.३०/०६/२०२५ रोजी मा. कुलसचिव यांच्या अध्यक्षतेखाली प्र.संचालक - संगणक केंद्र, प्र. संचालक - दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, उपकुलसचिव (ऑन-एक्झाम), उपकुलसचिव (प्री-एक्झाम) यांची एकत्रित चर्चा झाली. सदर चर्चेनुसार पात्रता, परीक्षा व संगणक केंद्राने त्यांच्या अडचणी सादर कराव्या असे ठरले होते. त्यानुसार परीक्षा विभागामार्फत दुहेरी पदवी संदर्भातील अडचणी या केंद्रास कळविण्यात आल्या. परीक्षा विभागाबरोबर तसेच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्याही प्रवेश पात्रतेपासून परीक्षेपर्यत येणाऱ्या अडचणीबाबत प्रशासकीय पातळीवर अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते, त्या अडचणी व त्यावरील उपाययोजना एकत्रित सोबत जोडून दिनांक २५ सप्टेबर २०२५ रोजीच्या बैठकीत विषय क्र. ८ नुसार याबाबत विषय ठेवण्यात आला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८ | अ) दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश, पात्रतेपासून परीक्षेपर्यंत येणा-या अडचणीसाठी सुचिवण्यात आलेल्या उपाययोजनेनुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. |

Scanned with CamScanner

अधिष्ठाता मंडळ
दिनांक :- 14/01/2026

| | | |
|---|---|---|
| | ब) | याबाबत सविस्तर नियमावली तयार करण्यासाठी अधिष्ठाता मंडळासमोर विषय ठेवण्यात यावा. |

सबब, दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश, पात्रतेपासून परीक्षेपर्यंत येणा-या अडचणीबाबत सविस्तर नियमावली करणेची बाब विचारार्थ.)

दुरुस्ती - टिपणीतील मजकूरात "दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीपुढे विषय ठेवला असता ठराव क्र. ८ व्दारे खालीलप्रमाणे ठराव समंत झाला आहे," असे वाचावे.

| | |
|---|---|
| ठराव | दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश, पात्रतेपासून परीक्षेपर्यंत येणाऱ्या अडचणीबाबत सविस्तर नियमावली करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्ती करण्यात आली.<br>१. प्रा. (डॉ.) ए. बी. साळी — अध्यक्ष<br>प्र.अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा<br>२. प्राचार्या (डॉ.) श्रीमती व्ही. व्ही. मैंदर्गी — सदस्य<br>प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा<br>४. उपकुलसचिव, प्री-एक्झाम — सदस्य<br>५. उपकुलसचिव, पात्रता विभाग — सदस्य<br>६ प्रभारी संचालक, दुरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र — सदस्य सचिव |

बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सदस्य सचिव यांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहिर केले.

प्रा. (डॉ) एस. डी. डेळेकर
सदस्य सचिव
प्र. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ

प्रा. (डॉ.) श्रीमती जे. पी. जाधव
अध्यक्ष
मा. प्रभारी प्र-कुलगुरू

Scanned with CamScanner

**ACADEMIC COUNCIL**
**25TH SEPTEMBER, 2025**

विषय क्र. ८. दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश,पात्रतेपासून परीक्षेपर्यंत येणा-या अडचणी व उपाय योजना बाबतची बाब विचारार्थ.

(सोबत: दुहेरी पदवी संदर्भातील परीक्षा विभाग व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अडचणी व त्यावरील उपाययोजना.)

(टिपणी:- संगणक केंद्रामार्फत दुहेरी प्रमाणपत्राच्या संगणक प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार बदल करण्याबाबत दि.३०/०६/२०२५ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. याबाबत दि.३०/०६/२०२५ रोजी मा. कुलसचिव यांच्या अध्यक्षतेखाली प्र.संचालक-संगणक केंद्र,प्र.संचालक-दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, उपकुलसचिव (ऑन) उपकुलसचिव (प्री) यांची एकत्रित चर्चा झाली. सदर चर्चेनुसार पात्रता परीक्षा व संगणक केंद्राने त्यांच्या अडचणी सादर कराव्या असे ठरले होते. त्यानुसार परीक्षा विभागामार्फत दुहेरी पदवी संदर्भातील अडचणी कळविलेल्या आहेत. परीक्षा विभागाबरोबर तसेच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्याही प्रवेशपात्रते पासून परीक्षेपर्यंत येणा-या अडचणीबाबत प्रशासकीय पातळीवर अनेक तांत्रिक अडचणीना सामोरे जावे लागते त्या अडचणी व त्यावरील उपाययोजना सोबत जोडल्या आहेत.

सबब, दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश,पात्रतेपासून परीक्षेपर्यंत येणा-या अडचणी व उपाय योजनाबाबतची बाब विचारार्थ.)

**ठराव- अ) दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश, पात्रतेपासून परीक्षेपर्यंत येणा-या अडचणीसाठी सुचविण्यात आलेल्या उपाय योजनेनुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) याबाबत सविस्तर नियमावली तयार करण्यासाठी अधिष्ठाता मंडळासमोर विषय ठेवण्यात यावा.**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सभा व निवडणूका विभाग
Shivaji University, Kolhapur

Scanned with CamScanner

विषय क्र. ९. विद्यापीठ संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील नियमित व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमाचा विहीत कालावधी पुर्ण होऊनही अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीची सुविधा मिळणेबाबत विचारार्थ.

(टिपणी : विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून दि. १३ एप्रिल २०२२ रोजीच्या परिपत्रकातील तदतूदीनुसार दुहेरी पदवी संदर्भात मार्गदर्शकसूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार नियमित/दूरशिक्षण विद्यार्थ्यांना एका वेळेस दोन नियमित अभ्यासक्रम अथवा दोन दूरशिक्षण तसेच एक नियमित व एक दूरशिक्षण अंतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत २०२२ व २०२३ अंतर्गत परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार या केंद्राकडील विद्यार्थ्यांकडून दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश अर्ज व शुल्क अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर केले जातात. तसेच नियमित विद्यार्थ्यांच्याबाबत पात्रता विभागामार्फतही परिपत्रके प्रसिध्द करणेत आलेली आहेत. अशा अर्जावर प्रथम व द्वितीय प्रवेश असलेल्या दोन्ही महाविद्यालयाचे संबंधित प्राचार्य/संचालक याची स्वाक्षरी घेतली जाते आणि तो अर्ज द्वितीय प्रवेशाच्या ठिकाणी सादर करून त्या विद्यार्थ्यांची टी.सी. न घेता दुहेरी पदवी अर्जामध्ये त्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या आधारे त्याचा प्रवेश व पात्रता अंतिम केली जाते.

उपरोक्त सुविधेचा लाभ मिळण्याबाबत विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या काही महाविद्यालयामध्ये नियमित अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना मूळ टी.सी. अभावी प्रवेश नाकारण्यात येतो. यातील काही विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा विहीत कालावधी पूर्ण करूनही काही विषय राहून गेलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या अभ्यासक्रमाला नियमित प्रवेश असलेल्या महाविद्यालय/अधिविभागामार्फत त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण न झाल्याने टी. सी. देता येत नाही तथापि टी.सी. दिल्यास प्रवेश रद्द् होतो. यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात येतात. याबाबत विद्यापीठाने वरील संदर्भानुसार दुहेरी पदवीसंदर्भातील मार्गदर्शकसूचना सर्व संलग्नित महाविद्यालयांना यापूर्वी वेळावेळी कळविण्यात आलेल्या आहेत.

सबब, विद्यापीठ संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील नियमित व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमाचा विहीत कालावधी पूर्ण होऊनही अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीची सुविधा मिळणेबाबत विचारार्थ.)

**ठराव- विद्यापीठ संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील नियमित व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमाचा विहीत कालावधी पुर्ण होऊनही अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीची सुविधा मिळणेच्या अनुषंगाने एका अभ्यासक्रमाच्या सर्व सत्रे पुर्ण झालेल्या अशा विद्यार्थ्यांनी विहित शुल्क रु. १०००/- भरुन एकाच वेळी दोन अभ्यासक्रमाच्या परीक्षा देणेसाठी अर्जदाराने आवश्यक परवानगी घेऊन दुरशिक्षण व नियमित अथवा दोन्ही नियमित अभ्यासक्रमासाठी दुहेरी पदवीची सुविधा देण्यास मान्यता देण्यात आली.**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सभा व निवडणूक विभाग Shivaji University, Kolhapur

Scanned with CamScanner

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004, MAHARASHTRA
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION
PHONE : – 2609105, 2609451, 2609452
www.unishivaji.ac.in, e-mail-cde@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 416004, महाराष्ट्र
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९१०५, २६०९४५१, २६०९४५२
www.unishivaji.ac.in, e-mail-cde@unishivaji.ac.in

जा-क्र- शिवाजी वि/सीडीओई/ 1230 दिनांक २४/०४/२०२६

प्रति,

| अ.क्र | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रा.(डॉ.) ए. बी. साळी, प्र.अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | अध्यक्ष |
| २ | प्राचार्या (डॉ.) श्रीमती व्ही. व्ही. मैदर्गी प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ३. | डॉ. एन. जे. बनसोडे, उपकुलसचिव, पात्रता विभाग | सदस्य |
| ४. | डॉ. एन. एस. माने, उपकुलसचिव, प्री.-एक्झाम | सदस्य |
| ५. | डॉ. के. बी. पाटील, प्रभारी संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र | सदस्य सचिव |

**विषय :** दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्याच्या प्रवेश, पात्रतेपासून परीक्षेपर्यत येणा-या अडचणीबाबत सविस्तर नियमावली करणेसाठी समिती गठीत केलेबाबत...

**संदर्भ :** अधिष्ठाता मंडळाची दि.१४/०१/२०२६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ०७.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भास अनुसरून, दुहेरी पदवी अंतर्गत नियमित व दूरशिक्षण माध्यमातून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्याच्या प्रवेश, पात्रतेपासून परीक्षेपर्यत येणा-या अडचणीबाबत सविस्तर नियमावली करणेबाबत उपरोक्त प्रमाणे समिती गठीत करणेत आली आहे. सदर समितीची बैठक **दिनांक २८/०४/२०२६** रोजी **दुपारी ५:०० वाजता** दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात **रूम नंबर ३१२** येथे आयोजित करणेत आली आहे. सदर बैठकीस उपस्थित राहावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

Shinde

उपकुलसचिव

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
दिनांक : 21/03/2025
(दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र (प्रवेश विभाग)

परीक्षा व मूल्यमापन मंडळासाठी विषय:

| | |
|---|---|
| ( 11 ) | दूरशिक्षण केंद्रामधील दुहेरी पदवी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या Overlap Papers परीक्षा Sports चे विद्यार्थी अथवा पर्यायी विद्यार्थ्यांच्या परीक्षेसोबत घेण्याबाबतची बाब |

(टिपणी : शैक्षणिक वर्ष 2024–2025 मध्ये दुहेरी पदवी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या Overlap Papers होणा–या परीक्षा Sports विद्यार्थ्यांच्या परीक्षेसोबत घेण्यात याव्यात. दुहेरी पदवी परीक्षाबाबत विद्यार्थी हित लक्षात घेता राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 यास सुसंगत अमंलबजावणी आवश्यक आहे.

1 दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रवेश घेत असताना त्यांना Admission to DualDegree Open as per UGC norms अशा पध्दतीने Advertisement केलेली असते.

2 दुहेरी अभ्यासकमांस प्रवेशित असलेले विद्यार्थी हे शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने ठरवून दिलेल्या पात्रता विभागाच्या नियमावली नुसार प्रवेशाची संधी उपलब्ध असलेने एकाच वेळी दुहेरी पदवी अभ्यासकमांस प्रवेश घेवून एक नियमित व एक दूरशिक्षण केंद्राअंतर्गत प्रवेश घेवून दोन अभ्यासकमांच्या विषयाचे अभ्यास करून. परीक्षा देण्याची व कोर्स पूर्ण करण्याची मुभा दिली असलेने त्यांना दोन अभ्यासकम पूर्ण करता येणे शक्य होते.

3 दूरशिक्षणकेंद्राच्या प्रवेश वाढीकरीता दुहेरी प्रवेशित विद्यार्थ्यांची मोलाची भर यामध्ये होत असते.

4 दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये दोन्ही कोर्सचे पेपर एकाचवेळी व एकाच दिवशी आल्याने विद्यार्थ्यांची संभ्रम अवस्था निर्माण होते. अशावेळी विद्यार्थी गोंधळून जातात व दोन अभ्यासक्रमाच्या परीक्षेबाबत एकाच वेळी येणारी वेळ व तारीख बदलून देणेसाठी अर्ज सादर करतात

सदर विद्यार्थ्यांना एकाच वेळी दुहेरी पदवी परीक्षेचा लाभ मिळाला नसलेस या सर्वांचा मोठा विपरित परिणाम विद्यापीठाच्या व पर्यायाने राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मुलभूत हेतूवर होण्याची शक्यता आहे.

सबब, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील दुहेरी पदवी प्रवेशित विद्यार्थ्यांचे Overlap झालेले पेपर्स यांची परीक्षा Sports विद्यार्थी अथवा पर्यायी विद्यार्थ्यांच्या परीक्षेसोबत घेण्यात येण बाबतची बाब परीक्षा मंडळाच्या बैठकीमध्ये विचारार्थ)

**ठराव कं 11**

दूरशिक्षण केंद्रामधील दुहेरी पदवी प्रवेशित विद्यार्थ्यांचे एकाच दिवशी दोन पेपर आल्यास संबंधीत विषयाच्या पेपरची परीक्षा खेळाडू विद्यार्थ्यांच्या परीक्षेसोबत (पुरवणी परीक्षा) घेण्यात यावी.

SHIVAJI UNIVERSITY, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. KOLHAPUR.

Scanned with OKEN Scanner

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52

## Internal Quality Assurance Cell

## ACADEMIC AND ADMINISTRATIVE AUDIT REPORT 2024-25

---

**Name of the Department – Distance and Online Education**

**Date: - 29/09/2025**

| | |
|---|---|
| Commendations by the AAA Committee | 1. More than sufficient E-content in English and local languages is available.<br>2. Clear and articulated vision, mission and objectives for the CDOE.<br>3. Sufficient contact classes and certificate courses are highly appreciated.<br>4. Programs are designed in line with NEP guidelines.<br>5. Curriculums relevance, flexibility, employability with regular revision is appreciated.<br>6. Transparent counselling (Admission) and grievance redressal. |
| Recommendations of the AAA Committee | 1. Self sustained E-content recording studio for content recording and streaming is recommended.<br>2. Recommendation and feedback from stakeholder should be collected.<br>3. SOPs for the new students coming to the Centers to be prepared and displayed.<br>4. CDOE can evaluate academic quality, digital infrastructure and outcomes with a balance between traditional, academic signs and technology enable learning. |

Grade: A

Signatures of the AAA Committee

| Name | | Sign |
|---|---|---|
| Prof. S. H. Bhosale | Chairman | [signature] |
| Prof. Muniswamy David | Member | [signature] |
| Dr. Pankaj Pawar | Co-ordinator | [signature] |